दैनिक

wwww.lokaarambh.com

# लोक आरंभ

संपादक: राहुल मारोतीराव वाईकर

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

बीड | वर्ष - ०४ थे | अंक ४७ | रविवार १ फेब्रुवारी २०२६ | RNI/MAHMAR/2022/84215 Postal No LSB/Beed/RNP-270/2026-2028 | पान ४ | किंमत २ रू

Beed | year - o4 th | Issue 47 | Sunday,1February 2026 | RNI/MAHMAR/2022/84215 Postal No LSB/Beed/RNP-270/2026-2028 | Page 4 | Price 2

# उपमुख्यमंत्र्यांचा शपथविधी होताच जरांगे पाटलांची पहिली प्रतिक्रिया

राजकीय वर्तुळातून मोठी बातमी समोर येत आहे, सुनेत्रा पवार यांनी आज उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली आहे. राजभवनामध्ये उपमुख्यमंत्र्यांच्या शपथविधीचा सोहळा पार पडला. राज्यपालांनी सुनेत्रा पवार यांना उपमुख्यमंत्रिपदाची शपथ दिली, त्यापूर्वी राष्ट्रवादी पक्षाच्या आमदारांच्या बैठकीमध्ये त्यांची गटनेता म्हणून देखील निवड करण्यात आली आहे, दरम्यान सुनेत्रा पवार यांची उपमुख्यमंत्रिपदी निवड झाल्यानंतर आता मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्री झाल्या, हा त्यांच्या पक्षाचा विषय आहे. पहिल्या महिला उपमुख्यमंत्री झाल्या, हा चांगला विषय आहे. राजकीय डावपेच मी सांगू शकत नाही, मात्र अजित पवार यांच्या जागेवर त्यांचाच माणूस हवा होता, असं यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्री झाल्या, हा त्यांच्या पक्षाचा विषय आहे. पहिल्या महिला उपमुख्यमंत्री झाल्या, हा चांगला विषय आहे. राजकीय डावपेच मी सांगू शकत नाही. त्यांनी आता सर्वांना सोबत घेऊन चालावं, आता गिधाड घिरट्या घालायला लागले आहेत, त्यांच्यावर आता लक्ष ठेवावे लागेल, अजितदादांसोबत न दिसणारे गिधाड आता दिसू लागले आहेत, सुनेत्रा पवार



यांनी अचानक जमलेल्या या ढेकणांवर लक्ष ठेवावे, असा सल्ला यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी सुनेत्रा पवार यांना दिला आहे. काही अडचणीमुळे सुनेत्रा पवार यांनी तातडीनं उपमुख्यमंत्रिपद स्विकारलं असावं, पार्थ आणि जय पवार यांना दादांनी काही सल्ला दिला असेल तर त्याचं त्यांनी पालन करावं, असंही यावेळी जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. दरम्यान आज शरद पवार यांनी सकाळी पत्रकार परिषद घेऊन मोठं विधान केलं होतं, आपल्याला उपमुख्यमंत्र्यांच्या शपथविधी सोहळ्याबद्दल काहीही माहिती नाही,

## काय म्हणाले मनोज जरांगे पाटील?



सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्री झाल्या, हा त्यांच्या पक्षाचा विषय आहे. पहिल्या महिला उपमुख्यमंत्री झाल्या, हा चांगला विषय आहे. राजकीय डावपेच मी सांगू शकत नाही. त्यांनी आता सर्वांना सोबत घेऊन चालावं, आता गिधाड घिरट्या घालायला लागले आहेत, त्यांच्यावर आता लक्ष ठेवावे लागेल, अजितदादांसोबत न दिसणारे गिधाड आता दिसू लागले आहेत, सुनेत्रा पवार यांनी अचानक जमलेल्या या ढेकणांवर लक्ष ठेवावे, असा सल्ला यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी सुनेत्रा पवार यांना दिला आहे. काही अडचणीमुळे सुनेत्रा पवार यांनी तातडीनं उपमुख्यमंत्रिपद स्विकारलं असावं, पार्थ आणि जय पवार यांना दादांनी काही सल्ला दिला असेल तर त्याचं त्यांनी पालन करावं, असंही यावेळी जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.

## श्री छत्रपती कनिष्ठ महाविद्यालय, खर्डा येथे १२ वी विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहात




खर्डा ( प्रतिनिधी) प्रा. महेश बजगुडे

श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळ खर्डा संचलित श्री छत्रपती कनिष्ठ महाविद्यालय, खर्डा येथे इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. किरण खेडकर होते. याप्रसंगी प्रा. सचिन नाळे, प्रा. शुभांगी गोलेकर, प्रा. विकास पाचरणे आदी शिक्षकवृंद उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात स्वागतगीत व विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून वातावरण आनंदी केले. प्राचार्य किरण खेडकर यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात विद्यार्थ्यांना उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या व जीवनात परिश्रम, शिस्त आणि आत्मविश्वासाचे महत्त्व सांगितले. शिक्षकांनीही विद्यार्थ्यांच्या आठवणींना उजाळा देत मार्गदर्शन केले.

बारावीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या भावना व्यक्त करत महाविद्यालयीन जीवनातील आठवणी सांगितल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. सिद्धी येवले हिने तर आभार प्रदर्शन कु. वृषाली जाधवर हिने केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी तसेच विद्यार्थ्यांच्या भावी उज्वल भविष्यासाठी संस्थेचे सचिव डॉ महेश गोलेकर यांनी शुभेच्छा दिल्या.

## अजित पवार विमान अपघात प्रकरणी मोठा ट्वीस्ट, विमान कंपनीचे काळे कारनामे उघड

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा विमान अपघातात दुर्दैवी अंत झाला. या घटनेनंतर सर्वांनाच धक्का बसला आहे. आता या प्रकरणाने एक धक्कादायक वळण घेतले आहे. ज्या VSR व्हेंचर्स कंपनीचे विमान अजित पवार वापरत होते, ती कंपनी आंतरराष्ट्रीय स्तरावर आधीच ब्लॅकलिस्ट म्हणजे काळ्या यादीत असल्याची माहिती समोर येत आहे. युरोपियन युनियनच्या सुरक्षा यंत्रणेने (EASA) या कंपनीच्या सुरक्षिततेवर गंभीर ताशेरे ओढले होते. तरीही ही कंपनी सेवा कशी पुरवत होती, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. काय आहे 'लेव्हल १' नोटीसचे प्रकरण?

विमान वाहतुकीतील आंतरराष्ट्रीय मानकांनुसार, युरोपियन युनियन एव्हिएशन सेफ्टी एजन्सीने (EASA) VSR व्हेंचर्स या कंपनीला लेव्हल १ ची नोटीस दिली होती. याचा अर्थ असा की, कंपनीच्या विमानांमध्ये प्रवाशांचा जीव धोक्यात येऊ शकतो अशी गंभीर तांत्रिक त्रुटी होती. सप्टेंबर २०२३ मध्ये मुंबईत झालेल्या एका अपघातानंतर कंपनीने आवश्यक कागदपत्रे आणि सुरक्षा रेकॉर्ड



देण्यास नकार दिला होता. ज्यामुळे त्यांचे परवाने वर्षभरापूर्वीच निलंबित करण्यात आले होते. आता याप्रकरणी युरोपियन युनियनच्या सुरक्षा यंत्रणेने तपासातील ३ सर्वात मोठे खुलासे केले आहेत. सुरक्षिततेच्या कारणास्तव बंदी असूनही ही कंपनी उड्डाणे कशी करत होती? हे यंत्रणेचे मोठे अपयश मानले जात आहे. मूळ पायलट वाहतूक कोंडीत अडकल्याने १५ हजार तासांचा अनुभव असलेल्या कॅप्टन सुमित कपूर यांना ऐनवेळी बोलावण्यात आले होते. त्यांना उड्डाणाची तयारी करण्यासाठी पुरेसा वेळ मिळाला नव्हता का? असा संशय व्यक्त होत आहे. तसेच पहिल्या प्रयत्नात लँडिंग न होणे आणि दुसऱ्या प्रयत्नात संतुलन बिघडणे, यामागे इंजिन निकामी होणे किंवा अनस्टेबल फायनल अप्रोच कारणीभूत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. महाराष्ट्र सरकारने या प्रकरणाचा तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे (CID) सोपवला आहे. केंद्राच्या AAIB विभागाने ब्लॅक बॉक्स जप्त केला आहे. यातील माहितीवरून अपघाताचे नेमके कारण स्पष्ट होईल. कंपनीच्या मालकांवर कडक कारवाई होण्याची दाट शक्यता आहे.

**नेमकं काय घडलं?**

अजित पवार यांचे विमान २८ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ८:१० वाजता मुंबईहून बारामतीसाठी रवाना झाले. सकाळी ८:४६ च्या सुमारास बारामती विमानतळावर लँडिंगचा पहिला प्रयत्न अयशस्वी झाला. दुसऱ्यांदा लँडिंगचा प्रयत्न करत असताना विमानाचे संतुलन बिघडले आणि ते धावपट्टीपासून काही अंतरावर एका शेतात कोसळले. जमिनीवर आदळताच विमानाचा भीषण स्फोट झाला.

## आरारारा खतरनाक, महापौर पदासाठी चंद्रपूरात फिल्मी स्टाईलने नगरसेवक पळवण्याचा प्रयत्न

महाराष्ट्राच्या चंद्रपूरमधील काँग्रेसच्या नवनिर्वाचित नगरेसवकांनाच पळवण्याचा प्रयत्न करण्यात आला. या अपहरणाच्या प्रयत्नाने एकच खळबळ उडाली आहे. गुरुवारी संध्याकाळी नागपूरकडे जाणारी एक बस थांबवून काँग्रेस नगरसेवकाला जबरदस्तीने नेण्याचा प्रयत्न करण्यात आला. मास्क लावून आलेल्या काही लोकांनी हा प्रयत्न केला. पोलिसांनी या प्रकरण सहा लोकांविरोधात गुन्हा नोंदवला आहे. तर एका आरोपीला अटक केली आहे. दुसरीकडे शिवीगाळ केल्याचे एक प्रकरणही समोर आले आहे. त्यामुळे काँग्रेसमध्ये चाललंय काय, असा सवाल केल्या जात आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चंद्रपूर महानगरपालिकेचे नवनिर्वाचित नगरसेवक नागपूरला जात होते. ही बस वर्धा जिल्ह्यातील येलाकेली टोल नाक्यावर संध्याकाळी 5:45 मिनिटांनी थांबवण्यात आली. जवळपास 4 ते 6 वाहनांतून आलेल्या 20 जणांनी या




बसला वेढा दिला. हे सर्व तरुण तोंडाला मास्क लावून आलेले होते. त्यांनी बसमधून काँग्रेसच्या नगरसेवकांनी जबरदस्ती खाली उतरवण्याचा प्रयत्न केला. त्याचवेळी काँग्रेसचे कार्यकर्तेही इतर वाहनातून तिथे पोहचले. दोन्ही गटात या टोलनाक्यावर धक्काबुक्की झाली. तणाव वाढताच स्थानिकांनी पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी परिस्थिती हाताळली. काँग्रेसचे नगरसेवक राजेश अडूर यांच्या तक्रारी आधारे पोलिसांनी नागपूर येथील कनेन सिद्दीकी यांना अटक केली आहे. तर इतर पाच जणांची ओळख पटवण्यात आली आहे. इतर अज्ञातांविरोधात भारतीय न्याय संहिता BNS च्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



महाराष्ट्राचे मुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री स्व. अजित दादा पवार यांना शिरापूर धुमाळ येथील ग्रामस्थांच्या वतीने श्रद्धांजली देण्यात आली

## नांदेड जिल्ह्यात २३ तूर खरेदी केंद्र निश्चित २०-फेब्रुवारी पर्यंत ऑनलाईन नोंदणी करता येणार

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : केंद्र शासनाच्या किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत नाफेडच्या वतीने नांदेड जिल्ह्यात खरीप हंगाम २०२५-२६ साठी तूर पिकाची हमीभावाने खरेदी करण्यात येणार आहे. यासाठी शेतकऱ्यांची २० जानेवारी ते २० फेब्रुवारी २०२६ या कालावधीत ऑनलाईन पोर्टलवर नोंदणी करण्यात येणार आहे. या अनुषंगाने जिल्ह्यात एकूण २३ खरेदी केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. तरी शेतकऱ्यांनी हमीभाव खरेदी योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा पणन अधिकारी आर. जी. गव्हाणे यांनी केले आहे. नांदेड जिल्ह्यात खालील खरेदी केंद्रांवर मार्केटिंग फेडरेशनमार्फत तूर पिकासाठी शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी सुरू करण्यात आली आहे. तालुका खरेदी-विक्री संघ मुखेड / हदगाव / बिलोली (कासराळी) / लोहा, कुंडलवाडी विविध कार्यकारी सेवा सहकारी



संस्था, कुंडलवाडी, नांदेड जिल्हा फळे व भाजीपाला सहकारी संस्था, अर्धापुर, पंडित दीनदयाल उपाध्याय अभिनव सहकारी संस्था, देगलूर, बळीराम पाटील फळे व भाजीपाला सहकारी खरेदी-विक्री संस्था, बेरळी, मुखेड फळे व भाजीपाला सहकारी खरेदी-विक्री संस्था, उमरदरी, किनवट तालुका कृषीमाल प्रक्रिया सहकारी संस्था, गणेशपूर (ता. किनवट), जय महाराष्ट्र शेतीमाल खरेदी-विक्री सहकारी संस्था, कौठा, स्वामी विवेकानंद अभिनव सहकारी संस्था, शेळगाव थडी (ता. धर्माबाद), अष्टविनायक शेतीमाल खरेदी-विक्री सहकारी संस्था, मानवाडी फाटा (ता. हदगाव), महात्मा बसवेश्वर ग्रामीण विकास मंडळ, बापशेटवाडी (मुक्रामाबाद), शेतकरी उत्पादक कंपनी, रातोळी / बेटमोगरा, पांडुरंग फळे व भाजीपाला सहकारी संस्था, धामनगाव, बळीराजा पणन अभिनव सहकारी संस्था, कोठारी (ता. किनवट), श्रीराम जानकी अभिनव शिक्षण प्रसारक मंडळ, सगरोळी (ता. बिलोली), चक्रधर फळे व भाजीपाला सहकारी संस्था, बिल्लाळी (ता. मुखेड), स्वामी विवेकानंद अभिनव नाविन्यपूर्ण सहकारी संस्था, देगलूर, स्व. प्रमोद महाजन अभिनव नाविन्यपूर्ण सहकारी संस्था, पाळा (ता. मुखेड), जगदंबा विद्याप्रसारक मंडळ, बाऱ्हाळी (ता. मुखेड)याप्रमाणे आहेत. तरी शेतकरी बांधवांनी ऑनलाईन नोंदणीसाठी चालू हंगामातील तूर पिकाची ऑनलाईन नोंद असलेला सातबारा उतारा, आधारकार्ड व राष्ट्रीयकृत बँकेचा पासबुक ही आवश्यक कागदपत्रे संबंधित तालुक्यातील खरेदी केंद्रावर सादर करावीत. नोंदणी प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने POS मशीनद्वारे करण्यात येणार असल्याने नोंदणीसाठी शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष खरेदी केंद्रावर उपस्थित राहणे अनिवार्य आहे, अशी माहिती जिल्हा पणन अधिकारी आर. जी. गव्हाणे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

# सं पा द की य

## देवांच्या दारी भक्त आणि ‘ व्हीआयपी ‘यांना वेगळा न्याय का ?

प्रशांत बाफना 8055440385

देवाच्या दरबारात सगळे समान असतात,ही संकल्पना भारतीय समाजाच्या धार्मिक आणि सांस्कृतिक जाणिवेत खोलवर रूजलेली आहे. ‘ देवाचिये द्वारीं उभा क्षणभरी । तेणें मुक्ति चारी साधियेल्या ‘असे संत तुकाराम महाराजांनी म्हटले आहे. तुकोबाच्या या चार ओळी केवळ भक्तीचा उत्कट भाव व्यक्त करत नाहीत,तर देवाच्या दारातील समतेचा मूलभूत संदेशही देतात. दरवर्षा लाखो वारकरी अनवाणी पायाने चालत पंढरीची वारी करतात. गर्दीमुळे मंदिरात जाता आले नाही तरी लांबूनच कळसाचे दर्शन घेऊन धन्यता मानतात. कोणतेही तीर्थक्षेत्र असो,सामान्य भाविकांच्या लांबच लांब रांगा सर्वत्र दिसतात. तासनतास उभे राहणे, उन्हापावसाची पर्वा न करता प्रतीक्षा करणे आणि अखेर काही क्षणांचेच दर्शन मिळणे, हा अनुभव बहुसंख्यांचा. याच रागांच्या शेजारून मात्र ‘अतिमहत्त्वाच्या व्यक्ती ‘विनासायास आत जातात.सुरक्षा, प्रोटोकॉल,प्रतिष्ठा अशी कारणे दिली जातात. तासनतास रांगेत उभे राहून गर्भगृहापर्यंत पोहोचलेल्या वारकऱ्यांसह मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्र्यांना आषाढी-कार्तिकी महापूजेचा मान दिला जातो.वारकरी संप्रदायातील ही समानता इतरत्र मात्र अभावानेच आढळते. पण या सवलतींमुळे समाजमनात निर्माण होणारी अस्वस्थता दिवसेंदिवस तीव्र होत आहे.समस्या केवळ धार्मिक स्थळांपुरती मर्यादित नाही.अजिंठा- वेरूळ सारखी जागतिक पर्यटन स्थळे,किल्ले, राष्ट्रीय उद्याने, विमानतळ, रेल्वे स्थानके आदी सर्वत्र “ विशेष ‘ लोकांसाठी वेगळी दारे उघडी असतात.देवाच्या दारी उभे राहणे हेच मुक्तीचे साधन मानले गेले,तर त्या व अन्यत्रच्या द्वारी ‘विशेष ‘ आणि ‘सामन्य ‘ असा भेद कसा स्वीकारायचा असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना नेहमीच भडसावत असतो.

उज्जैनच्या महाकालेश्वर मंदिरातील व्हीआयपी दर्शन आणि गर्भगृह प्रवेशाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर सुनावणी घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट नकार दिला आहे.धार्मिक विधी आणि मंदिरातील प्रवेशाचे नियम ठरवणे हा न्यायालयीन विषय नसल्याचे सांगत, न्यायालयाने मंदिर व्यवस्थापनाच्या स्वायतत्तेला महत्त्व दिले हा निर्णय कायदेशीरदृष्ट्या योग्य असला,तरी त्यातून निर्माण होणारा सामाजिक प्रश्न मात्र दुर्लक्षित करता येणार नाही.सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात न्यायालयीन संयम दाखवला आहे. धार्मिक संस्थांच्या अंतर्गत व्यवस्थापनात हस्तक्षेप टाळणे,ही घटनात्मक मर्यादा न्यायालयाने अधोरेखित केली.पण त्याच वेळी सुधारणा न्यायालयाकडून नव्हे,तर
समाजातून आणि व्यवस्थापनातून यायला हव्यात,अशी अपेक्षाही व्यक्त केली आहे.

आज अनेक धर्मस्थळांमध्ये व्हीआयपी दर्शन हे श्रद्धेचा नव्हे,तर प्रतिष्ठेचे साधन बनले आहे. देणगीच्या नावाखाली जलद दर्शन,विशेष पूजा,गर्भगृह प्रवेश दिला जातो.हा प्रकार सर्वसामान्य भाविकांना चीड आणणारा आहे. अतिविशिष्ट व्यक्तींच्या सुरक्षेचा मुद्दा व्यवस्थापनाकडून पुढे केला जातो.तो मान्य केला तरी त्यांच्यासाठी वेगळी व्यवस्था केली जाऊ शकते.सामान्य भाविकांना त्यांच्यासाठी तासनतास तिष्ठत ठेवणे योग्य ठरत नाही. न्यायालयाने हस्तक्षेप न केल्यामुळे आता जबाबदारी थेट मंदिर व्यवस्थापन ,सरकारे आणि समाजावर येऊन ठेपली आहे.व्हीआयपी संस्कृतीवर मर्यादा घालायची की नाही, दर्शन व्यवस्थेत पारदर्शकता आणायची की नाही,समानतेचा भाव प्रत्यक्षात उतरवायचा की नाही हे प्रश्न न्यायालयात नव्हे, तर सार्वजनिक चर्चेतून आणि लोकदबावातून सुटले पाहिजेत.देवाच्या दारातही ‘प्रोटोकॉल ‘च महत्त्वाचा ठरणार असेल,तर लोकशाहीतील समतेचा दावा उरणारच नाही. सर्वोच्च न्यायालयाने कायदेशीर सीमारेषा आखून दिली आहे.त्या सीमारेषेपलीकडे जाऊन समतेचा भाव प्रत्यक्षात उतरवण्याची नैतिक जबाबदारी आता मंदिर व्यवस्थापन, सरकारे आणि समाजावर आहे

# शेवगावात देशी-विदेशी मद्यविक्री परवान्याबाबत अहवालात गंभीर विसंगती; नियमभंग व दिशाभूल केल्याचा आरोप

शेवगाव/प्रशांत बाफना — शेवगाव नगरपरिषद हद्दीतील देशी व विदेशी मद्यविक्री व्यवसायासंदर्भात सादर करण्यात आलेल्या अहवालात नियमांचे उल्लंघन व तथ्यात्मक त्रुटी आढळून आल्याचा आरोप करण्यात आला आहे. प्रकरणी दारूबंदीचे कार्यकर्ते अमोल घोलप यांनी
तक्रार अर्ज सादर केला आहे.



तक्रारीनुसार, बॉम्बे प्रोहिबिशन ॲक्ट, १९४९ नुसार शैक्षणिक व सामाजिक संस्था, शासकीय कार्यालये, उद्याने, दवाखाने व धार्मिक स्थळांपासून मद्यविक्री दुकाने किमान १०० मीटर अंतरावर असणे आवश्यक असताना अहवालात हे अंतर ७५ मीटर असल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. तसेच अहवालात FL-2/18 व FL-3/22 परवाना असलेली दुकाने बंद असल्याचे नमूद करण्यात आले असले तरी प्रत्यक्षात ती दुकाने सुरू असल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला आहे. संबंधित परवाना धारकांकडून दरवर्षी रीतसर नूतनीकरण होत असून चुकीची कागदपत्रे सादर करून प्रशासनाची दिशाभूल करण्यात आल्याचा आरोप आहे.

या पार्श्वभूमीवर शेवगाव नगरपरिषदेने सिटी सर्वे नं. २३३४ (मि.), नगरपरिषद मिळकत नं. ९८२६ या मालमत्तेसंदर्भात मा. अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, अहिल्यानगर यांच्याकडे अहवाल सादर केला होता. भाडेकरूने देशी-विदेशी मद्यविक्री व्यवसायासाठी ना-हरकत दाखल्याकरिता अर्ज केला होता. अर्जासोबत मालकी हक्काची कागदपत्रे, बांधकाम परवाना, पूर्णत्व प्रमाणपत्र व इतर दस्तऐवज जोडण्यात आले होते.


मात्र प्रत्यक्ष पाहणीत प्रस्तावित अनुज्ञप्तीपासून गणपती मंदिर ६८ मीटर, मस्जिद ६० मीटर व १८५७ पासून अस्तित्वात असलेली मराठी मुलांची शाळा ९० मीटर अंतरावर असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच २०० मीटर हवाई अंतराच्या नियमांतर्गत तत्सम परवाना अस्तित्वात असल्याबाबतही शंका व्यक्त करण्यात आली आहे.

या सर्व बाबींची सखोल पडताळणी करून दिशाभूल करणाऱ्या संबंधित व्यक्तींवर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी तक्रारीत करण्यात आली आहे. तसेच परवाना सुरू अथवा बंद असल्याबाबतची खातरजमा मा. अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, अहिल्यानगर यांच्याकडून करून घेण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात आली आहे

# दोन लग्न केले असतांना तिसरे लग्न; पतीला दिली कोर्टाने ‘हि’ शिक्षा

अहिल्यानगर / प्रशांत बाफना दोन विवाह झालेले असतानाही घटस्फोटाचा खोटा पुरावा दाखवून तिसरे लग्न करणाऱ्या पतीला मुख्य न्यायदंडाधिकारी एल. एस. पाढेण यांनी दोन वर्षे सक्तमजुरी आणि १० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. जयदीप कौशिक मोरे (वय ३४, रा. अभियंता कॉलनी, औरंगाबाद रोड, अहिल्यानगर) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे. या खटल्याची पार्श्वभूमी अशी की, आरोपीने फिर्यादी महिलेची फसवणूक करून तिच्याशी विवाह केला होता. आरोपीचे पूर्वी दोन विवाह झाले होते, तरीही त्याने दुसऱ्या पत्नीसोबत घटस्फोट झाल्याचा बनावट पुरावा सादर केला. तोफखाना पोलीस ठाण्यात याप्रकरणी भादंवि कलम ४९४, ४९८ अ, ५०४ आणि ५०६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर खटला मुख्य न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात चालला. अभियोग पक्षाच्या वतीने एकूण चार साक्षीदार तपासण्यात आले. पुरावे आणि साक्षीदारांची साक्ष ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपी जयदीप मोरे याला कलम ४९४ (दुसरा विवाह करणे) अंतर्गत दोषी ठरवले. दंडाची १० हजार रुपये रक्कम फिर्यादी महिलेला नुकसान भरपाई म्हणून देण्याचे आदेशही न्यायालयाने दिले आहेत. दरम्यान, पुराव्याअभावी इतर पाच आरोपींची छळवणूक आणि इतर कलमांमधून निर्दोष मुक्तता करण्यात आली. या खटल्यात सरकारी पक्षाच्या वतीने कनिष्ठ वकील अमित यादव आणि सीमा शेख यांनी काम पाहिले. त्यांना तपास अधिकारी पोलीस हवालदार एस. डी. मोरे आणि पैरवी अधिकारी सहायक फौजदार नितीन गायकवाड यांनी सहकार्य केले. अहिल्यानगर जिल्हा न्यायालयात या निकालाची मोठी चर्चा सुरू होती. अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू; वाटेफळ शिवारातील हायवेवर भीषण अपघात अहिल्यानगर/ जिल्हा प्रतिनिधी – तालुक्यातील वाटेफळ शिवारात असणाऱ्या विश्वशांती हॉटेलजवळ एका अज्ञात वाहनाने दुचाकीला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात दत्तात्रय कोंडीबा गाडे यांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून वाहनाचे मोठे नुकसान झाले आहे. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात अज्ञात चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी गणेश दत्तात्रय गाडे आणि त्यांचे वडील दत्तात्रय गाडे हे आपल्या दुचाकीवरून (क्रमांक MH-16-DU-5344) जात असताना ही घटना घडली. अज्ञात वाहनावरील चालकाने आपले वाहन भरधाव वेगात आणि हयगईने चालवून फिर्यादीच्या दुचाकीला जोराची धडक दिली. या धडकेत फिर्यादीला गंभीर दुखापत झाली, तर त्यांचे वडील दत्तात्रय गाडे यांचा मृत्यू झाला. अपघातानंतर अज्ञात चालक वाहनासह घटनास्थळावरून पसार झाला आहे. फिर्यादीने दिलेल्या दवाखाना जबाबावरून पोलिसांनी भारतीय न्याय संहिता आणि मोटार वाहन कायद्याच्या विविध कलमान्वये गुन्हा नोंदवला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार वांढेकर हे सपोनि प्रल्हाद गिते यांच्या मार्गदर्शनाखाली करत आहेत. महामार्गावरील वाढत्या अपघातांमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. कॉलेज तरुणीचा पाठलाग करणाऱ्या तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल; सावेडी परिसरातील घटना अहिल्यानगर/प्रशांत बाफना : कॉलेजला जाताना आणि घरी येताना एका तरुणीचा सतत चोरून पाठलाग करून तिला त्रास देणाऱ्या एका विकृत तरुणाविरुद्ध तोफखाना पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना सावेडी उपनगरातील निर्मलनगर परिसरात घडली असून, यामुळे परिसरात खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पीडित तरुणी ही न्यू आर्ट्स कॉलेजमध्ये शिक्षण घेत आहे. त्याच कॉलेजमध्ये शिकणारा आरोपी सागर संजय टोकेकर (रा. केडगाव देवी, शिवाजीनगर) हा गेल्या काही दिवसांपासून या तरुणीवर पाळत ठेवत होता. पीडितेने त्याला अनेकदा बजावून देखील त्याने तिचा पाठलाग करणे थांबवले नाही. डिसेंबर महिन्यापासून आरोपीने तरुणीच्या घरासमोर मोटारसायकलवरून येऊन तिला हातवारे करणे आणि तिचा पाठलाग करणे सुरूच ठेवले होते. दिनांक २४ जानेवारी रोजी दुपारी आरोपी पुन्हा तरुणीच्या घरासमोर आला आणि त्याने तिला आवाज देऊन त्रास देण्याचा प्रयत्न केला. या सततच्या त्रासामुळे आणि छेडछाडीमुळे पीडित तरुणीने अखेर धाडस दाखवून तोफखाना पोलीस स्टेशन गाठले आणि फिर्याद दिली. पोलिसांनी या प्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या कलम ७८ (२) नुसार आरोपी सागर टोकेकर विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अंमलदार गोसावी करत आहेत

# प्राण्यांवर हल्ला करणारा बिबट्या जेरबंद,



अहिल्यानगर| प्रशांत बाफना
अनेक पाळीव प्राण्यांवर करंजी परिसरात हल्ला करणाऱ्या बिबट्यास पिंजऱ्यात जेरबंद करण्यास वनविभागास अखेर यश आले. करंजी-दगडवाडी रस्त्याच्या जवळ लावलेल्या पिंजऱ्यात हा बिबट्या रात्री कैद झाल्याने परिसरातील नागरिकांनी वनविभागाच्या कर्मचाऱ्याचे कौतुक केले. पाथर्डी तालुयाच्या पश्चिम भागातील करंजीसह दगडवाडी, भोसे, वैजुबाभूळगाव, लोहसर यासह परिसरातील अनेक गावातील पाळीव प्राण्यांवर हल्ले झाले. लोकांच्या तक्रारीवरून वनविभागाने करंजी ते दगडवाडी रस्त्याच्या वनपाल शर्माळे यांनी हा बिबट्या मादी जातीचा असल्याचे सांगून आतापर्यंत तालुयात ३ बिबट्यांना जेरबंद केले आहे. बिबट्या एका रात्रीत १५ ते २० किलोमीटर अंतर चालतो. त्यामुळे तो इथे दिसला की काही वेळाने दुसऱ्या गावात दिसत असल्याचे सांगितले. यावेळी वनविभाग तिसगावचे वनपरिक्षेत्र अधिकारी अविनाश तेलोरे, वनपाल ए.एम.शर्माळे, वनपाल आर. एम. सिरसाट, वनरक्षक एस. ए. कराळे, वाय.डी. खेडकर, मनिषा सिरसाट, वनमजूर घोरपडे, एन.सी. पालवे, मिठू अकोलकर, पाखरे हजर होते. जेरबंद बिबट्याला पाहण्यासाठी लोकांनी मोठी गर्दी केली होती

# अंतर्गत मागणी: भारतीय अर्थव्यवस्थेचा भक्कम आधारस्तंभ

प्रशांत बाफना 8055440385
जागतिक बाजारपेठ सध्या व्यापार युद्धाच्या छायेखाली आणि भू-राजकीय तणावाच्या विळख्यात अडकलेली असताना, भारतीय अर्थव्यवस्थेने आपली लवचिकता आणि अंतर्गत ताकद पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. वर्ष २०२५-२६ च्या आर्थिक पाहणी अहवालातून समोर आलेली आकडेवारी भारताच्या आर्थिक सुस्थितीचे दर्शन घडवते. चालू आर्थिक वर्षात ७.४ टक्के इतका मजबूत विकास दर गाठल्यानंतर, आगामी २०२६-२७ या आर्थिक वर्षातही ६.८ ते ७.२ टक्क्यांच्या दरम्यान राहणारा वृद्धीदर हा भारतीय अर्थव्यवस्थेच्या पायाभूत मजबुतीचा पुरावा आहे. विशेष म्हणजे, या संपूर्ण प्रक्रियेत ‘घरगुती उपभोग’ किंवा देशांतर्गत मागणी हा अर्थव्यवस्थेचा मुख्य चालक ठरला आहे. कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीमुळे ग्रामीण भागातील मागणीत झालेली वाढ आणि कर सुधारणांमुळे सर्वसामान्य कुटुंबांच्या हाती खर्च करण्यासाठी उरलेल्या अधिकच्या उत्पन्नामुळे शहरी उपभोगालाही मोठी चालना मिळाली आहे. महागाईच्या आघाड्यावर मिळालेले यश हे या आर्थिक चित्रातील अत्यंत दिलासादायक बाब मानली पाहिजे. एप्रिल ते डिसेंबर २०२५ या कालावधीत ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित महागाईचा दर १.७ टक्क्यांपर्यंत खाली येणे, हे सामान्य जनतेसाठी सुखद आहे. रिझर्व्ह बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या अंदाजानुसार, आगामी काळात महागाईत किंचित वाढ होण्याचे संकेत असले, तरी ती आरबीआयच्या चार टक्क्यांच्या निर्धारित मर्यादेतच राहण्याची चिन्हे आहेत. मात्र, जागतिक स्तरावर मुक्त व्यापाराबद्दल निर्माण झालेली साशंकता, औद्योगिक धोरणांमधील बदल आणि महत्त्वाच्या खनिजांसाठी सुरू असलेली स्पर्धा यामुळे जागतिक पुरवठा साखळीचे स्वरूप बदलत आहे. या जागतिक घडामोडींचा दबाव भारताची निर्यात आणि रुपयाच्या मूल्यावर जाणवत असून, वित्तीय तूट जीडीपीच्या ३.२ टक्क्यांपर्यंत पोहोचणे हे वाढत्या आर्थिक दबावाचे लक्षण आहे. असे असले तरी, भारताने आपल्या निर्यातीची गती कायम राखण्यात यश मिळवले आहे. वस्तू आणि सेवांच्या निर्यातीत झालेली वाढ ही जागतिक मंदीच्या पार्श्वभूमीवर कौतुकास्पद आहे. युरोपियन युनियन, ब्रिटन, न्यूझीलंड आणि ओमान यांसारख्या देशांशी झालेले व्यापार करार हे अमेरिकेवरील अवलंबित्व कमी करून नवनवीन बाजारपेठा शोधण्याच्या दृष्टीने टाकलेले धोरणात्मक पाऊल आहे. ७०१ अब्ज डॉलर्सपेक्षा अधिकचा विक्रमी परकीय चलन साठा ही भारतासाठी एक मोठी सुरक्षा कवच ठरली असून, यामुळे सुमारे ११ महिन्यांच्या आयातीचा खर्च सोसण्याची क्षमता निर्माण झाली आहे. जरी व्यापार तूट हे अजूनही एक आव्हान असले, तरी त्यात झालेली किंचित सुधारणा सकारात्मक आहे. सारांशतः, आर्थिक पाहणी अहवाल हाच संदेश देतो की, जागतिक अनिश्चिततेच्या काळातही भारताची आर्थिक नौका स्थिर आहे; परंतु जागतिक जोखमींचा सामना करण्यासाठी निरंतर सुधारणा आणि सतर्कता बाळगणे ही काळाची गरज आहे.

# नगरला इतिहासात मोठा निधी अजित दादांमुळे मिळाला; आमदार दाते

## राष्ट्रवादी कॉंग्रेस नगरसेवकांच्या वतीने अजित दादांना श्रद्धांजली

अहिल्यानगर | प्रशांत बाफना
अहिल्यानगर महानगरपालिका राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष नगरसेवकांच्या वतीने राज्याचे उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित दादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. नगराचे विकास कामातून बदललेले रूप म्हणजेच स्वर्गीय अजित दादा होय, असे मत आमदार काशीनाथ दाते यांनी यावेळी व्यक्त केले.
या वेळी माजी आमदार व जिल्हा बँकेचे अध्यक्ष चंद्रशेखर घुले, राष्ट्रवादीचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, माजी उपमहापौर गणेश भोसले, जिल्हाध्यक्ष अशोक सावंत, राजेंद्र गुंड, संजय कोळगे, गटनेते प्रकाश भागानगरे, माजी महापौर भगवान फुलसोदर, नगरसेवक कुमारसिंह वाकळे, अविनाश घुले, बाळासाहेब बारस्कर, बाळासाहेब पवार, संजय चोपडा, राजेंद्र गुंड, संजय कोळगे, सुरेश बनसोडे, अजिंय बोरकर, महेश तवले, डॉ. सागर बोरुडे, सुनील काळे, विपुल शेटिया, विजय गव्हाळे, मयूर बांगरे, केशव नागरगोजे, जालिंदर कोतकर, महेंद्र कांबळे, सुमित लोंढे, जितू गंभीर, गोरख पडोळे, संग्राम रासकर, जय भोसले, किसन भिंगारदिवे आदी उपस्थित होते.
उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या अकाली निधनाने संपूर्ण महाराष्ट्र हतबल झाला असून सर्वसामान्य माणसाच्या डोळ्यातून अश्रू अनावर झाले आहेत. अजित दादा आणि अहिल्यानगर शहर यांचे अतूट नाते आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून



घडले होते. त्यांच्या दुःखद निधनाबद्दल श्रद्धांजलीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.
आमदार काशीनाथ दाते म्हणाले की, शहराच्या इतिहासात एवढा मोठा निधी कधीही मिळाला नव्हता. तो निधी आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून स्वर्गीय अजित दादा पवार यांनी अहिल्यानगर शहराच्या विकासासाठी दिला. त्यांनी नेहमीच दर्जेदार विकासकामांकडे लक्ष दिले. वयाच्या ७०व्या वर्षी दादांनी मला न्याय देत सर्वसामान्य कार्यकर्त्याला पारनेर मतदारसंघाचा आमदार केले. अहिल्यानगर शहर हे अजित दादा यांच्या विचाराचे आहे. माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील म्हणाले, स्वर्गीय अजित दादांनी सर्वात जास्त नगर शहराचे आमदार संग्राम जगताप यांना न्याय आणि प्रेम दिले, म्हणूनच विकासाची कामे मार्गी लागली. दादांनी आपल्यावर टाकलेली जबाबदारी आपण सर्वांनी पार पाडायची आहे. माजी उपमहापौर गणेश भोसले म्हणाले, माझ्या ३०-३५ वर्षांच्या राजकारणाच्या कार्यकाळात कधीही एवढा मोठा निधी मिळाला नव्हता. तो निधी आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून अजित दादांनी अहिल्यानगर शहराच्या विकासासाठी दिला. माझ्या प्रभागामध्ये नगरकरांच्या हक्काचे हॉस्पिटल व क्रीडा संकुलाचे काम पूर्ण झाले. हे काम स्वर्गीय अजित दादा पवार यांच्या माध्यमातून पूर्ण झाले. त्यांच्या हस्तेच या वस्तूंचे उद्घाटन करायचे होते, मात्र ते स्वप्नच राहिले. कार्यकर्त्यांची दखल घेणारा नेता म्हणजे स्वर्गीय अजित दादा होय.
सोमवारी सहकार सभागृह येथे सर्वपक्षीय शोकसभा शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर म्हणाले, स्वर्गीय अजित दादा पवार यांच्या निधनामुळे सर्वपक्षीय शोकसभा दिनांक ०२ फेब्रुवारी रोजी सहकार सभागृह येथे आयोजित करण्यात आली आहे. अजित दादांनी आपल्या परखड वाणीतून जनतेची मने जिंकली. स्पष्टवक्तेपणामुळे ते संपूर्ण देशाला परिचित होते. जातिपातीच्या पलीकडचा माणूस म्हणून त्यांची ओळख होती. त्यांनी राजकीय वाटचालीत संघर्ष केला. आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून अजित दादांची स्नेहाचे संबंध आले आणि नगरकरांच्या विकासाची वाट मोकळी झाली. निवडणुकीच्या काळात आपण जनतेसमोर मते मागण्यासाठी जात होतो, तेव्हा मतदारांना केलेल्या विकासकामांची आठवण करून दिली जात होती, ही अभिमानाची गोष्ट होती. कार्यक्रमात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या नगरसेवकांनी श्रद्धांजलीपर मनोगत व्यक्त केले

# कुजबुजेतून गंभीर गुन्ह्याचा छडा!

## डोंगरतळा प्रकरणात जिंतूर पोलीसांचा पोलीस अधीक्षकांकडून सन्मान





जिंतूर (प्रतिनिधी) घटनेबाबत कोणताही ठोस पुरावा नसताना, घटना कधी व कशी घडली याची माहिती नसताना, केवळ दबक्या आवाजातील कुजबुज आणि संशयाच्या धाग्यावरून जिल्हा पोलीस अधीक्षक रवींद्र सिंग परदेशी यांनी संमती देताच डोंगरतळा येथील सामूहिक अत्याचार प्रकरणाचा छडा लावून आरोपींना बेड्या ठोकण्यात जिंतूर पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांना घवघवीत यश आले. या उल्लेखनीय तपासाबद्दल प्रजासत्ताक दिनानिमित्त जिल्हा पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी यांनी पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे, सहाय्यक पोलीस निरीक्षक पुंड व बिट जमादार दत्तात्रय गुंगाने यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविले. डोंगरतळा शिवारातील कमळजाई देवी मंदिर परिसरातील निर्जन ठिकाणी मित्रांसोबत येणाऱ्या महिलां व तरुणींचा विनयभंग करून त्यांच्याकडील मोबाईल व रोख रक्कम लुटण्याच्या घटना घडल्या होत्या. मात्र भीतीपोटी कोणतीही तक्रार दाखल होत नसल्याने आणि घटनांबाबत स्पष्ट माहिती नसल्याने हे प्रकरण अंधारात होते.

दरम्यान, यातील एका घटनेची गोपनीय माहिती पोलीस निरीक्षक गजेंद्र कुमार सरोदे यांना मिळाली. त्यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक पुंड व बिट जमादार गुंगाने यांना सोबत घेत गोपनीय पद्धतीने तपास सुरू केला. तपासाअंती सहा आरोपींना ताब्यात घेण्यात आले. मात्र आरोपी ताब्यात असतानाही पोलिसांसमोर मोठे आव्हान होते ते फिर्यादी शोधण्याचे.
पोलीस निरीक्षक सरोदे व त्यांच्या पथकाने परिसरात कसून शोधमोहीम राबवून प्रथम एका पीडितेचा शोध घेत पहिला गुन्हा दाखल केला. त्यानंतर तपासात आरोपींनी यापूर्वीही अशाच प्रकारचे अनेक गुन्हे केल्याचे उघड झाले. पुढे आणखी एका महिलेचा शोध घेऊन दुसरा विनयभंगाचा गुन्हा नोंदवण्यात आला.
पोलीस दलाच्या या धाडसी, संयमित आणि कौशल्यपूर्ण तपासाची दखल घेत जिल्हा पोलीस अधीक्षकांनी तिघांनाही प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित केले. या गौरवामुळे जिंतूर शहरासह ग्रामीण भागात पोलिसांच्या कार्याबद्दल समाधान व कौतुक व्यक्त केले जात आहे.

# सहकारी पतसंस्थेच्या कारभारात गंभीर अनियमितता...चार संचालकांवर कठोर कारवाई

अहिल्यानगर/ प्रशांत बाफना – अहिल्यानगर येथील वीज तांत्रिक कामगार सहकारी पतसंस्थेच्या कारभारात गंभीर अनियमितता झाल्याचे स्पष्ट होत असून, थकबाकीदार ठरलेल्या चार संचालकांवर सहकार विभागाने कठोर कारवाई केली आहे. सहकार विभागाचे जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांनी पतसंस्थेचे माजी चेअरमन, माजी व्हाइस चेअरमन यांच्यासह चार संचालकांना पुढील पाच वर्षांसाठी अपात्र ठरविण्याचा आदेश दिला आहे. सदर पतसंस्थेत एकूण 17 संचालक असून, त्यापैकी सहा संचालक थकबाकीत गेल्याचा प्रकार उघडकीस आला होता. याप्रकरणी संचालक किशोर काळे व सभासद शरद काकडे यांनी दि. 27 मे 2025 रोजी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहिल्यानगर यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली होती. तक्रारीनुसार, सचिन चोरगे, आशिष वेळापुरे व अरविंद पाठक हे संचालक 31 मार्च 2025 अखेर थकबाकीदार ठरले होते. सहकारी संस्थेमध्ये कर्जवाटपानंतर वसुली करणे ही संपूर्ण संचालक मंडळाची सामूहिक जबाबदारी असताना, संचालकच थकबाकीत गेल्याने संस्थेच्या आर्थिक शिस्तीवर व हितावर गंभीर परिणाम झाला. सहकारी कायद्यानुसार निवडून आलेला संचालक थकबाकीदार ठरल्यास तो संचालकपदासाठी अपात्र ठरतो.

तक्रार प्राप्त झाल्यानंतर जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांनी सविस्तर सुनावणी घेतली. त्यानंतर पतसंस्थेचे माजी चेअरमन सचिन चोरगे, माजी व्हाइस चेअरमन आशिष वेळापुरे, अरविंद पाठक व सचिन सुडके या चार संचालकांना पाच वर्षांसाठी अपात्र ठरविण्याचा आदेश देण्यात आला आहे. दरम्यान, थकबाकीदार ठरलेल्या संचालकांनी यापूर्वी पारदर्शक कारभाराचा आग्रह धरणारे माजी चेअरमन बाळासाहेब जावळे यांच्याविरोधात कोणताही ठोस पुरावा नसताना बेकायदेशीर अविश्वास ठराव आणल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे. या प्रकरणी बाळासाहेब जावळे यांनी विभागीय सहनिबंधक, नाशिक यांच्याकडे दावा दाखल केला असून, तो सध्या प्रलंबित आहे.

तसेच उर्वरित दोन थकबाकीदार संचालकांचे पुरावे सादर करूनही त्यांच्यावर अद्याप अपात्रतेची कारवाई न झाल्याने, या निर्णयाविरोधातही विभागीय सहनिबंधक, नाशिक यांच्याकडे दाद मागण्यात येणार असल्याचे तक्रारदार किशोर काळे व शरद काकडे यांनी स्पष्ट केले आहे. संस्थेच्या हितास बाधा आणणाऱ्या व्यक्तींविरोधात कायदेशीर कारवाई पुढेही सुरूच राहील, असा इशाराही त्यांनी दिला आहे. या प्रकरणातील सुनावणीदरम्यान ॲड. श्री. बबनराव कवडे यांनी कायदेशीर कामकाज पाहिले.

# नगर तालुक्यात जमिनीच्या वादातून वृध्दावर हल्ला; सहा जणांविरूध्द गुन्हा दाखल

अहिल्यानगर/ प्रशांत बाफना -जमिनीच्या वादातून एका वृध्द शेतकऱ्याला लाकडी दांडक्याने आणि लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना निंबोडी (ता. अहिल्यानगर) शिवारात घडली आहे. राधाकिसन बळवंत भिंगारदिवे (वय 57, रा. फर्याबाग, अहिल्यानगर-सोलापूर रस्ता) असे जखमी शेतकऱ्याचे नाव आहे. या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात सहा जणांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नागेश चंदर भिंगारदिवे, संतोष चंदर भिंगारदिवे, संतोष भिंगारदेवेची पत्नी व दोन मुले आणि एक अनोळखीविरोधात हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी भिंगारदिवे यांची निंबोडी शिवारात शेतजमीन आहे. 26 जानेवारी रोजी दुपारी ते शेतात असताना संशयित आरोपी नागेश भिंगारदिवे, संतोष भिंगारदिवे आणि त्यांच्यासोबत असलेल्या नातेवाईकांनी बेकायदेशीर जमवून फिर्यादीला गाठले.तू शेतात का आलास? अशी विचारणा करत त्यांना शिवीगाळ केली. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले आणि आरोपींनी लाकडी दांडक्याने फिर्यादीला मारहाण करत जीवे मारण्याची धमकी दिली. या हल्ल्यानंतर फिर्यादीने 29 जानेवारी रोजी पोलिसांत धाव घेतली. कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस अंमलदार रेवणनाथ मिसाळ करीत आहेत

# शुभेच्छा तरी कशा द्याव्यात..., रोहित पवारांचं ते ट्विट चर्चेत

आज सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली आहे, राजभवनामध्ये या शपथविधी सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं होतं. राज्यपालांनी सुनेत्रा पवार यांना उपमुख्यमंत्रिपदाची शपथ दिली. दरम्यान सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेताच त्यांच्याकडे इतरही तीन खात्यांची जबाबदारी सोपवण्यात आली आहे, ज्यामध्ये क्रीडा आणि युवक कल्याण, राज्य उत्पादन शुल्क आणि अल्पसंख्यांक मंत्रालयाचा समावेश आहे. दरम्यान त्यापूर्वी सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादीच्या गटनेतेपदी देखील निवड करण्यात आली, आज मुंबईमध्ये राष्ट्रवादीच्या सर्व आमदारांची महत्त्वाची बैठक बोलावण्यात आली होती, या बैठकीमध्ये एकमतानं सुनेत्रा पवार यांची गटनेतेपदी निवड करण्यात आली आहे. सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेताच रोहित पवार यांनी एक ट्विट केलं आहे, हे ट्विट आता चांगलंच चर्चेत आलं आहे. राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून मा. सुनेत्राकाकी यांनी शपथ घेतली, याचा आनंद आहे. खरं म्हणजे मा. अजितदादांची जागा कुणीच घेऊ शकत नाही पण किमान सुनेत्राकाकींच्या रुपात तरी आम्ही तिथं अजितदादांना पाहू..! डोक्यावर डोंगराएवढं दुःख असताना आणि आम्ही सर्वजण शोकाकूल असताना त्यांना शुभेच्छा तरी कशा द्याव्यात, हे कळत नाही..!' असं ट्विट रोहित पवार यांनी केलं आहे.

राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून मा. सुनेत्राकाकी यांनी शपथ घेतली, याचा आनंद आहे. खरं म्हणजे मा. अजितदादांची जागा कुणीच घेऊ शकत नाही पण किमान सुनेत्राकाकींच्या रुपात तरी आम्ही तिथं अजितदादांना पाहू..! डोक्यावर डोंगराएवढं दुःख असताना आणि आम्ही सर्वजण शोकाकूल असताना... नेत्रा पवार यांच्याकडे तीन खात्यांची जबाबदारी

दरम्यान सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर त्यांच्याकडे तीन खात्यांची जबाबदारी सोपवण्यात आली ज्यामध्ये क्रीडा आणि युवक कल्याण, राज्य उत्पादन शुल्क आणि अल्पसंख्यांक मंत्रालय या खात्यांचा समावेश आहे. मात्र सुनेत्रा पवार यांच्याकडे अर्थखातं देण्यात आलेलं नाहीये, समोर आलेल्या माहितीनुसार अर्थसंकल्प सादर होईपर्यंत या खात्याची जबाबदारी मुख्यमंत्र्यांकडेच राहणार आहे,

# सावळदबारा पंचायत समिती गणातून बसपा कडून सुनील नारायण माकोडे यांची अधिकृत उमेदवारी जाहीर..

सोयगाव / ता.
प्रतिनिधी : सुनील चोरमले..
..

सावळदबारा पंचायत समिती गणासाठी बहुजन समाज पक्षाच्या वतीने सुनील नारायण माकोडे यांच्या नावाची अधिकृत उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. अत्यंत गरीब कुटुंबातून पुढे आलेले, कष्टाळू व होतकरू उमेदवार म्हणून सुनील माकोडे यांची तालुक्यात ओळख आहे.

सुनील माकोडे यांच्याकडे महा-ई-सेतू केंद्र असून, या माध्यमातून त्यांनी सोयगाव तालुक्यातील असंख्य नागरिकांना तहसील कार्यालयामार्फत जातीचे प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र तसेच विद्यार्थ्यांशी संबंधित व इतर विविध शासकीय कामांमध्ये मोलाची मदत केली आहे. कोणताही राजकीय वारसा नसताना, केवळ आपल्या कामाच्या जोरावर त्यांनी जनतेत विश्वास निर्माण केला आहे. सामाजिक बांधिलकी जपत सामान्य नागरिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी नेहमी तत्पर राहणाऱ्या सुनील माकोडे यांना पंचायत समितीमध्ये काम करण्याची संधी द्यावी, असे आवाहन बहुजन समाज पक्षाच्या वतीने




करण्यात आले आहे. जनतेने इतर पक्षांच्या भूलथापांना बळी न पडता हत्ती या निवडणूक चिन्हावर मतदान करून सुनील माकोडे यांना सेवेची संधी द्यावी, असेही आवाहन करण्यात आले आहे

# अजितदादांनी नगर शहराचे आ. संग्राम जगताप यांना सर्वात जास्त प्रेम दिले..

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नगरसेवकांच्या वतीने स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांना श्रद्धांजली

अहिल्यानगर/ प्रशांत बाफना : अहिल्यानगर महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नगरसेवकांच्या वतीने राज्याचे उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित दादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. नगराचे विकास कामातून बदललेले रूप म्हणजेच स्वर्गीय अजित दादा होय, असे मत आमदार काशिनाथ दाते यांनी व्यक्त केले.

या वेळी उपस्थित होते आमदार काशिनाथ दाते, माजी आमदार व जिल्हा बँकेचे अध्यक्ष चंद्रशेखर घुले, शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, माजी उपमहापौर गणेश भोसले, जिल्हाध्यक्ष अशोक सावंत, राजेंद्र गुंड, संजय कोळगे, गटनेते प्रकाश भागानगरे, महापौर भगवान फुलसोदर, नगरसेवक कुमार सिंह वाकळे, अविनाश घुले, बाळासाहेब बारस्कर, बाळासाहेब पवार, संजय चोपडा, राजेंद्र गुंड, संजय कोळगे, सुरेश बनसोडे, अजिंक्य बोरकर, महेश तवले, डॉ. सागर बोरुडे, सुनील काळे, विपुल शेटीया, विजय गव्हाळे, मयूर बांगरे, केशव नागरगोजे, जालिंदर कोतकर, महेंद्र कांबळे, सुमित लोंढे, जितू गंभीर, गोरख पडोळे, संग्राम रासकर, जय भोसले, किसन भिंगारदिवे आदी.




अहिल्यानगरसह राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या अकाली निधनाने संपूर्ण महाराष्ट्र हतबल झाला असून सर्वसामान्य माणसाच्या डोळ्यातून अश्रू अनावर झाले आहेत. अजित दादा आणि अहिल्यानगर शहर यांचे अतूट नाते आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून घडले होते. त्यांच्या दुःखद निधनाबद्दल श्रद्धांजलीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

आमदार काशिनाथ दाते म्हणाले की, "शहराच्या इतिहासात एवढा मोठा निधी कधीही मिळाला नव्हता. तो निधी आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून स्वर्गीय अजित दादा पवार यांनी अहिल्यानगर शहराच्या विकासासाठी दिला. त्यांनी नेहमीच दर्जेदार विकासकामांकडे लक्ष दिले. वयाच्या ७०व्या वर्षी दादांनी मला न्याय देत सर्वसामान्य कार्यकर्त्याला पारनेर मतदारसंघाचा आमदार केले. अहिल्यानगर शहर हे अजित दादा यांच्या विचाराचे आहे.

माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील म्हणाले, "स्वर्गीय अजित दादांनी सर्वात जास्त नगर शहराचे आमदार संग्राम जगताप यांना न्याय आणि प्रेम दिले, म्हणूनच विकासाची कामे मार्गी लागली. दादांनी आपल्यावर टाकलेली जबाबदारी आपण सर्वांनी पार पाडायची आहे.

माजी उपमहापौर गणेश भोसले म्हणाले, "माझ्या तीस-पस्तीस वर्षांच्या राजकारणाच्या कार्यकाळात कधीही एवढा मोठा निधी मिळाला नव्हता. तो निधी आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून अजित दादांनी अहिल्यानगर शहराच्या विकासासाठी दिला. माझ्या प्रभागामध्ये नगरकरांच्या हक्काचे हॉस्पिटल व क्रीडा संकुलाचे काम पूर्ण झाले. हे काम स्वर्गीय अजित दादा पवार यांच्या माध्यमातून पूर्ण झाले. त्यांच्या हस्तेच या वस्तूंचे उद्घाटन करायचे होते, मात्र ते स्वप्नच राहिले. कार्यकर्त्यांची दखल घेणारा नेता म्हणजे स्वर्गीय अजित दादा होय.

शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर म्हणाले, "स्वर्गीय अजित दादा पवार यांच्या निधनामुळे सर्वपक्षीय शोकसभा दिनांक २ फेब्रुवारी रोजी सहकार सभागृह येथे आयोजित करण्यात आली आहे. अजित दादांनी आपल्या परखड वाणीतून जनतेची मने जिंकली. स्पष्ट वक्तेपणामुळे ते संपूर्ण देशाला परिचित होते. जातिपातीच्या पलीकडचा माणूस म्हणून त्यांची ओळख होती. त्यांनी राजकीय वाटचालीत संघर्ष केला. आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून अजित दादांची स्नेहाचे संबंध आले आणि नगरकरांच्या विकासाची वाट मोकळी झाली. निवडणुकीच्या काळात आपण जनतेसमोर मते मागण्यासाठी जात होतो, तेव्हा मतदारांना केलेल्या विकासकामांची आठवण करून दिली जात होती, ही अभिमानाची गोष्ट होती

# शोकसभा, श्रद्धांजली कार्यक्रमात मा.आ.चंद्रकांत दानवे यांना अश्रू अनावर.

## अजित दादा पवार यांचे भोकरदन जाफ्राबाद तालुक्यातील विकासात महत्वाचे योगदान:- माजी आमदार चंद्रकांत दानवे.

करीम लाला जालना जिला प्रातिनिधि
आज भोकरदन येथील मा.आ.चंद्रकांत पुंडलिकराव दानवे यांच्या संपर्क कार्यालयात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या कार्यक्रमास महाविकास आघाडी व विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी पुष्पहार अर्पण करून दोन मिनिटांचे मौन पाळत तीव्र शोक व्यक्त केला. तसेच स्व.अजितदादा पवार यांच्या सामाजिक, राजकीय व सार्वजनिक जीवनातील कार्याचा शांत व भावनिक वातावरणात गौरव करण्यात आला. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री, लाडके लोकनेते स्व.अजितदादा पवार यांच्यावर दि. 28 जानेवारी 2026 रोजी काळाने झडप घातली आणि विमान दुर्घटनेत त्यांचे निधन झाले. दि.29 जानेवारी 2026 रोजी महाराष्ट्रातील कान्या कोपऱ्यातुन व देश भरातुन लाखोंच्या संख्येने उपस्थित शोकाकूल जनसागराने साश्रु नयनांनी अखेरचा निरोप दिला. या पार्श्वभुमीवर आज भोकरदन येथील मा.आ.चंद्रकांत पुंडलिकराव दानवे यांच्या संपर्क कार्यालयात स्व. अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली देण्यासाठी शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी मा.आ.चंद्रकांत पुंडलिकराव दानवे, रमेश शेठ सपकाळ, युवानेते सुधाकर दानवे, त्र्यंबक पाबळे, सुरेश सपाटे, शफिक शेठ पठाण, मदनराव तुपे, शमीम मिर्झा, बोरसे गुरुजी, कैलास पुंगळे, पंढरिनाथ पवार, श्रावणकुमार आक्से, संग्रामराजे देशमुख, गंगाधर कांबळे, नसिम पठाण, रिजवान शेख, शब्बीर कुरेशी, जहीर कुरेशी इ. पदाधिकाऱ्यांनी आपले श्रद्धांजलीपर शोक व्यक्त करत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पित केली.

याप्रसंगी मा.आ.चंद्रकांत चंद्रकांत पुंडलिकराव दानवे यांनी भावनिक होत स्व.अजितदादा पवार यांच्यासोबत घालवलेल्या क्षणांच्या आठवणी काढत त्यांच्या कार्याला उजाळा दिल्या. ते बोलत असतांना पुढे म्हणाले की, दादांनी आपल्या भोकरदन जाफ्राबाद मतदारसंघात अनेकांची कामे केली, मी फोन केला की दादांनी मला कधीच निराश केले नाही. दि.28/10/2013 रोजी दादा आघाडी सरकारचे उपमुख्यमंत्री असतांना आपल्या भोकरदनला 220 KV, भोकरदन ते मालखेडा रस्ता भुमिपुजन, भोकरदन ते पारध रस्ता व तहसिल कार्यालयाच्या उद्घाटनासाठी तसेच आण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळाअंतर्गत साडे चार कोटी रूपयांचा निधी दादांच्या माध्यमातुन आपल्याला मिळाला व तो वाटप करण्यासाठी आपण भव्य कार्यक्रम घेतला होता तो मला आजही आठवत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच दादांकडुन मी हक्काने अनेक कामे मार्गी लावून घेतलीत, अनेक गोरगरीबांचे मेडीकलच्या विद्यार्थ्यांचे, वस्तीशाळा शिक्षकांचे काम दादांनी एका शब्दावर केल्याचे त्यांनी सांगितले. पाणी उपलब्धतेच्या

### माजी आमदार चंद्रकांत दानवे यांच्या कार्यालयात शोक सभा संपन्न

प्रमाणपत्राच्या अडचणी दूर करून कोल्हापुरी बंधारे व बॅरीजेस अशा अनेक सिंचनाच्या योजना मंजूर करण्यासाठी दादांची अनमोल साथ मिळाल्याचे ते म्हणाले. तसेच दादांच्या जाण्याने या महाराष्ट्राचे कधीही न भरून निघणारे नुकसान




झाले. कौटुंबिक संबंध असल्याने माझी खुप मोठी हानी झाल्याचे म्हणत असतांना त्यांना अश्रु अनावर झाले होते.

यावेळी युवानेते श्री.सुधाकर आण्णा दानवे, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष त्र्यंबक आप्पा पाबळे, रा.कॉ.पा.शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष रमेश शेठ सपकाळ, रा.कॉ.पा. तालुकाध्यक्ष सुरेश सपाटे, मा.जि.प.सदस्य कैलास पुंगळे, नगराध्यक्ष शमीम भाई मिर्झा, उपनगराध्यक्षा सुरेखाताई जाधव, गटनेते शफिक शेठ पठाण, मदनराव तुपे सर, लक्ष्मण ठोंबरे, सुनिल पा.साबळे, अजहर शहा, नसीम पठाण, बोरसे गुरुजी, अनिल मालक देशपांडे, इरफानोद्दीन सिद्दीकी, रिजवान शेख, अब्दुल कदिर बापू, आमेर पठाण, शिलाताई भारती, संग्रामराजे देशमुख, राजू देशमुख, शब्बीर कुरेशी, जहिर कुरेशी, गंगाधर कांबळे, रहेमान शेख, ईस्रारखा पठाण, फैसल चाऊस, डॉ. शालिकराम सपकाळ, जयराम मुठ्ठे साहेब, राधाकिसन भोसले, अंकुश वराडे, रामदास रोडे, पंढरीनाथ पवार, इरफान पटेल, अभिमन्यू जाधव, योगेश शर्मा, राजू इंगळे, प्रल्हाद पा. गोरे, शालिकराम गावंडे, रावसाहेब दाभाडे, रमेश बरडे, श्रवणकुमार आक्शे, के.डी. दांडगे, कृष्णा काळे, दत्ता पा. पुंगळे, भगवान ठोंबरे, गजानन घोडे, राजू बाबुराव गोरे, अंगद सहाणे, विष्णू भालेराव, आनंदालाल जैस्वाल, अनिल अपार, दिलीप पालकर सर, सारंगधर जामुंदे, उखाजी कोरडे, दिलीप बावसकर, जनार्धन सोळुंके, प्रमोद सुरडकर,नाना कऱ्हाळे, अरुण गावंडे, सुनील लोखंडे, अनिल संभेराव, गजानन वनारसे, संदीप सहाणे, फकिरा गवळी आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# आईच्या जागेवर मुलें, पत्नीच्या जागेवर पती, बहिणीच्या जागेवर भाऊ तर भावजयीच्या जागेवर भाया झाले नगरसेवक?

## लुडबुड पडणार महागात;पद होणार रद्द पुढील निवडणुक ही येणार धोक्यात

जिंतूर ( प्रतिनिधी) स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना ५०% आरक्षण देत सत्तेची दारे उघडली असली ,तरी अनेक ठिकाणी प्रत्यक्ष कारभार मात्र महिला लोकप्रतिनिधींच्या पती किंवा इतर नातेवाईकांच्या हाती असल्याचे चित्र सातत्याने दिसत आहे या बेकायदेशीर हस्तक्षेपाला आळा घालण्यासाठी शासन आणि न्यायपालिकेने आता कठोर भूमिका घेतली असून महिला लोकप्रतिनिधींच्या कामात पती किंवा इतर नातेवाईकांने लुडबुड केल्यास संबंधित लोकप्रतिनिधीचे पद रद्द करण्याची तरतूद करण्यात आली आहे तसेच पुढील निवडणुक लढवण्यावरही बंदी घालण्यात आली आहे त्यामुळे त्या महिलेची संपुर्ण राजकीय कारकीर्द धोक्यात येणार आहे त्यामुळे "पत्नीच्या नावावर कारभार पतीचा" ही प्रवृत्ती आता कायद्यांच्या कचाट्यात सापडणार आहे

### नगरसेविका "रबर स्टॅम्प" ठरली तर पद रद्द

हस्तक्षेप म्हणजे अधिकाराचा गैरवापर नगर विकास विभाग तसेच उच्च न्यायालयाच्या विविध निकालानुसार महिला लोकप्रतिनिधींच्या शासकीय कामात त्यांच्या पती ने किंवा



इतर नातेवाईकांने प्रत्येक हस्तक्षेप केल्यास ते गैरवर्तण ठरते प्रशासकीय बैठकांना पतीला किंवा इतर नातेवाइकांना सोबत नेणे अधिकाऱ्यांशी थेट संवाद साधनें किंवा पतीने किंवा इतर नातेवाईकांने स्वातंत्र्य पणे बैठक घेणे हे सर्व अधिकारांचा गैरवापर मानले जाईल

### महिला आरक्षणाचा मुळं उद्देश

महिलांचे राजकीय सक्षमीकरण व्हावे त्यांनी स्वातंत्र्य पणे निर्णय घ्यावेत आणि नेतृत्व करावे ,हाच महिला आरक्षणाचा मुळं हेतू आहे पती किंवा इतर नातेवाईकांच्या हस्तक्षेपामुळे महिलांचे नेतृत्व दबले जाऊ नये यासाठीच हा नियम लागू करण्यात आला आहे

### पुराव्यासह तक्रारींची चौकशी

कोणत्याही जागरूक नागरिक किंवा विरोधक जर महिला लोकप्रतिनिधींच्या पती किंवा इतर नातेवाईकांच्या हस्तक्षेपाचे (व्हिडिओ) चित्रीकरण फोटो, किंवा कागदोपत्री पुरावे सादर करत असेल तर त्यांची सखोल चौकशी होणार आहे तक्रारीत तथ्य आढळल्यास तात्काळ कारवाईचा बडगा उगारण्यात येणार आहे

### खरी सत्ता पती किंवा इतर नातेवाईकांच्या हाती

अनेक प्रभागा मध्ये नगरसेविका केवळ नावालाच असुन , विकास कामांचे नियोजन अधिकाऱ्यांशी संवाद प्रशासकीय बैठका आणि पालिकेतील वावर हा त्यांच्या पती किंवा इतर नातेवाईकां कडुन केला जातो संविधानात "नगरसेविका पती" हि संकल्पनाच नसतांनाही प्रत्येक्षात मात्र प्रशासनावर त्यांचा प्रभाव दिसून येतो

### जिंतूर नगर परिषदेत,14 नगर सेविका

आरक्षणामुळे जिंतूर नगर परिषदेत मोठ्या प्रमाणात महिला नगरसेविका निवडुन आल्या आहेत स्विकृत सदस्या सहित 14 नगरसेविका सध्या शहराच्या विकासाचे प्रतिनिधीत्व करत आहेत मात्र त्यातील किती महिला सदस्य स्वतःहून निर्णय घेतात

# सुनेत्रा पवार यांना अर्थ खातं का मिळालं नाही?



अजित पवार यांच्या विमानाचा भीषण अपघात झाला, या अपघातामध्ये अजित पवार यांचं निधन झालं, दरम्यान अजित पवार यांच्या निधनानंतर आता राष्ट्रवादीचा गट नेता कोण होणार? नवा उपमुख्यमंत्री कोण होणार? याकडे सर्वांचं लक्ष लागलं होतं, अखेर आज सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली आहे, तसेच त्यांची विधिमंडळाच्या गटनेतेपदी देखील निवड करण्यात आली आहे. दरम्यान सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेताच समोर आलेल्या माहितीनुसार त्यांना तीन महत्त्वाच्या खात्याची जबाबदारी देखील देण्यात आली आहे, त्यामध्ये क्रीडा आणि युवक कल्याण, राज्य उत्पादन शुल्क आणि अल्पसंख्यांक मंत्रालयाचा समावेश आहे, मात्र सुनेत्रा पवार यांना अर्थ खातं देण्यात आलेलं नाहीये. सुनेत्रा पवार यांच्याकडे अर्थमंत्रालयाची जबाबदारी का देण्यात आली नाही? या संदर्भात आता मोठी बातमी समोर आली आहे.

दैनिक लोकआरंभ
रविवार १ फेब्रुवारी २०२६
www.lokaarambh.com



# बीड जिल्ह्याने पाहिलेले विकासाचे स्वप्न सुनेत्र ताईच्या माध्यमातून पुर्ण होईल - अमरसिंह पंडित

## अजितदादांच्या आठवणी बीडकरांनी जागवल्या

### बीड येथे शोकाकुल वातावरणात सर्वपक्षीय शोकसभेचे आयोजन

बीड दि.३०(प्रतिनिधी) दोन दिवस झाले तरी दादा आपल्यात नाहीत असे मनाला पटत नाही दादांच्या जाण्याने बीड सह महाराष्ट्राचे प्रचंड नुकसान झालेले आहे. अजित दादांचे नाव घेतल्याशिवाय महाराष्ट्राचा राजकीय इतिहास लिहिला जाऊ शकणार नाही. बीड जिल्ह्याच्या सामान्य जनतेने अजित दादा यांच्या माध्यमातून पाहिलेले विकासाचे स्वप्न उपमुख्यमंत्री सुनेत्राताईच्या माध्यमातून पूर्ण होईल अशी अपेक्षा व्यक्त करत स्वर्गीय अजितदादांच्या आठवणींना माजी आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित यांनी भावनिक उजाळा दिला. यावेळी बीड जिल्ह्यातील सर्व राजकीय पक्षांचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार व अजित दादा प्रेमी मोठ्या संख्येने शोकसभेला उपस्थित होते. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या आकस्मिक दु:खद निधनाच्या निमित्ताने बीड येथील रामकृष्ण मंगल कार्यालयात सर्वपक्षिय शोकसभेचे आयोजन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी अजितदादांच्या आठवणी जागवल्या. अतिशय शोकाकुल वातावरणात अजितदादांना उपस्थितांनी आदरांजली अर्पण केली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित, जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, माजी आमदार भिमराव धोंडे, बाळासाहेब आजबे, उषाताई दराडे, संजय दौंड, राजेंद्र जगताप नगराध्यक्षा प्रेमलता पारवे, सुशीलाताई मोराळे यांच्यासह सर्व राजकीय पक्षांचे नेते, विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी स्व. अजित दादा पवार यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी सर्वपक्षिय नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच अजित दादा पवार यांच्यावर प्रेम करणारे नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रास्ताविक भाषणात राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ॲड राजेश्वर चव्हाण म्हणाले की, सर्वांना सोबत घेऊन काम करताना शिव- शाहु- फुले- आंबेडकर विचाराला कधी दादांनी बगल दिली नाही, त्यांचे अकाली जाणे सर्वांना वेदना देऊन गेले होते. बीडला बारामती करण्याचा निर्धार केला होता. त्यांनी तसा शब्द दिला होता. उमेदीच्या काळात एक सक्षम नेतृत्व हरपले आहे. सुनेत्राताई उपमुख्यमंत्री झाल्या आहेत तेव्हा एकजुटीने पुन्हा हा विकास पुढे घेवून जाऊ. दादांच्या स्वप्नातला हा बीड जिल्हा निर्माण करुया असे त्यांनी सांगितले. यावेळी बोलताना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित म्हणाले की, दादा आपल्यात नाहीत हे अजूनही मनाला पटत नाही, दादा बीडचे पालकमंत्री झाले आहेत, आपल्या बीड जिल्ह्याचे चित्र बदलणार असे सर्व सामान्य जनतेला वाटत होते पण नियतीने दादांना हिरावून नेले आहे, त्यामुळे खुप नुकसान झाले आहे. शेवटच्या घटकाच्या घरापर्यंत अवकळा पसरली आहे, आपला माणूस गेल्याची भावना प्रत्येक माणसाची आहे. दादा केवळ पहिल्या बाकावरच्या आमदारांचे नव्हते तर ते शेवटच्या बाकावर बसणा-या कार्यकर्त्यांच्या हिताचा विचार करणारे होते. महाराष्ट्राचा राजकीय इतिहास जेंव्हा लिहिला जाईल तेव्हा दादांना वगळून हा इतिहास लिहिला जाऊ शकत नाही, दादा हे या शतकाचे जननायक आहेत. तत्वाशी तडजोड न करणारा नेता आपल्यातून गेला हे अतिशय वाईट झाले आहे. दादा गेल्याचे दु:ख मलाच नाही तर प्रत्येक सामान्य माणसाला आहे. बीड जिल्ह्यातील आम जनतेने पाहिलेले स्वप्न सुनेत्रा ताईंच्या रुपाने होईल. राष्ट्रवादी काँग्रेसचे ओबीसी सेलचे कल्याण आखाडे म्हणाले की, दिलेला शब्द पाळणारा नेता म्हणून अजितदादांची ओळख महाराष्ट्रभर होती. विकासाभिमुख नेतृत्व म्हणून दादा



सर्वपरिचित होते. मोठी संधी दादामुळे मला मिळाली. सामाजिक कार्यकर्त्या सुशिलाताई मोराळे म्हणाल्या की, आम्हाला दादा का भावले तर दादांनी आम्हाला कधीच अंतर दिले नाही. आमच्या सुख दुःखात धाऊन आले. दादांचे बीडचे आपुर्ण राहिलेले स्वप्न पूर्ण करु. माजी आमदार बाळासाहेब आजबे म्हणाले की, दादांच्या लाखो आठवणींने आमच्या मनात गर्दी केली आहे. दादा कामाचा माणूस होते. आपल्या जिल्ह्याला असा माणूस पालकमंत्री म्हणून मिळाले होते, पण त्यांचे जाणे आपल्यासाठी दूर्देव आहे. माजी आमदार उषाताई दराडे, अजितदादा हे शरद पवार साहेबांच्या कुशित तयार झालेले व्यक्तिमत्व होते. दादा सारखे नेतृत्व पुन्हा घडावे, त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून पुढे काम करावे. माजी आमदार भिमराव धोंडे म्हणाले की, अजितदादांचे कृषी, सिंचन, शिक्षण, समाज, राजकारण असे सर्व क्षेत्रात भरीव काम आहे. अजितदादांची जागा भरुन काढण्याचे काम करावे. माजी आमदार राजेंद्र जगताप म्हणाले की, सर्वांना समान न्याय देण्याचे काम दादांनी केले. सिंचनाच्या बाबतीत आणि महाराष्ट्र सुजलाम सुफलाम करण्यासाठी दादांनी आपले जीवन अर्पण केले. या मातीशी नाते तोडून, कार्यकर्त्यांना सोडून का गेलात... दादा परत या...परत या... अशा ओळी त्यांनी सादर केल्या. माजी आमदार संजय दौंड म्हणाले




की, दादांच्या जाण्याने महाराष्ट्राची प्रचंड हानी झाली आहे. जशी बारामती उभी केली तसे मला बीडला उभे करायचे आहे, असा शब्द दादांनी दिला होता. आपण सर्वांनी आता अजितदादा यांचा वादा पुर्ण करावयाचा आहे. नगरसेवक अमर नाईकवाडे म्हणाले की, अजितदादा हा नेता आम्हाला त्यांच्या कार्यकर्तृत्वाने भावला. त्यांच्या विचाराने आपण यापुढे काम करु. उपनगराध्यक्ष विनोद मुळूक म्हणाले की, दादांच्या कामाचा उरक आणि स्पष्टवक्तेपणा हे गुण आम्ही अंगिकारु, जेष्ठ नगरसेवक मोईन मास्टर म्हणाले की, सर्व समाजाला सोबत घेऊन काम करणारे, अन्यायाला वाचा फोडणारे अजितदादा एक हिरा होते, तो हिरा आता आपल्यातून हरपला आहे. दादांचे कार्य आपण सर्वांनी पुर्ण करावे. राष्ट्रवादी काँग्रेसचे पक्षाच्या वतीने दादासाहेब मुंडे म्हणाले की, ६५ वर्षांच्या महाराष्ट्रात ६६ वर्षांचा उपमुख्यमंत्री अजितदादांनी अर्थमंत्र्यांची यशस्वी परंपरा पुढे नेली. सिंचन क्षमता वाढली पाहिजे त्यामुळे शेतीचा विकास होणार हा विचार करणारे अजितदादा आज आपल्यात नाहीत, त्यामुळे आपले खुप मोठे नुकसान झाले आहे. त्यांनी दिलेला संदेश आणि विचार घेऊन आपण पुढे जावूया. शिवसंग्रामचे अनिल घुमरे म्हणाले की, स्व. विनायक मेटे गेल्यानंतर आमच्या अडचणीच्या काळात दादांनी आम्हाला बळ दिले. अजितदादा आणि मेटे यांच्या विचारांवर आपण यापुढील काळात काम करु. भारतीय जनता पक्षाचे शंकर देशमुख दादांचा आदर्श घेऊन काम करु असे ते म्हणाले, एमआयएमचे जिल्हाध्यक्ष ॲड. शेख रफिक म्हणाले, शिस्त आणि वक्तशीरपणा हा गुण दादांचा आपण सर्वांनी या निमित्ताने घेतला पाहिजे. बीड नगर परिषदेचे गटनेते फारुख पटेल म्हणाले की, मुस्लिम समाजाला सत्तेत मोठा वाटा देण्याचे काम अजितदादांनी केले. भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष अशोक लोढा म्हणाले की, अल्पसंख्याक अशा जैन समाजाला राजकारणाच्या प्रवाहात आणण्याचे काम अजितदादा पवार परिवाराने केले शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप म्हणाले की, अजितदादांच्या नेतृत्वाखाली काम करताना आंदोलने केली, त्यातून आम्हाला खुप कांहीं शिकायला मिळाले. आज दादा आपल्या नाहीत, फार वाईट वेळ आपल्यावर आली आहे. चांगले माणसं अकाली जाणे बीडचे दुर्दैव आहे. अजित दादा आज आपल्यात नाहीत पण प्रत्येकाच्या मनात आहेत. अजितदादांचे राहिलेले काम अमरसिंह पंडित यांनी यापुढे पूर्ण करावे. सरपंच संघटनेच्या वतीने कुंडलिक खांडे म्हणाले की, दादा एक धडाडीचे नेतृत्व होते. काम तडीस लावणे हे त्यांचे वैशिष्ट्य होते. बीडला चांगला पालकमंत्री मिळाला होता, त्यांच्या अकाली जाण्याने बीड जिल्ह्याचे मोठे नुकसान झाले आहे. यावेळी कृती समितीचे मारोती तिपाले, वकिल संघाचे अध्यक्ष ॲड. पिसोरे, राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाच्या वतीने जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, सि ए असोसिएशनचे सि.ए. बी.बी. जाधव, शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख वरेकर, आंबेडकर चळवळीतले सक्रिय कार्यकर्ते अजय सवाई, मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने गंगाधर काळकुटे यांच्यासह उपस्थित मान्यवरांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

# एकाच बाणात शंभर गार

## शरद पवारांचा 'पॉवर'गेम, पत्रकार परिषदेतून दिले अनेक संदेश

बारामती (संघर्ष वार्ता)राष्ट्रवादीतील नवीन अंकाचा प्रयोग राजपटलावर रंगला. दुखावट्याटात काही भूमिका अपरिहार्यपणे घ्याव्या लागतात. पण त्यात मुरब्बीपणा, कसलेला नेताच दाखवू शकतो. नाहीतर नाट्याचा पडदा उघडताना आतील गदारोळ आपोआप समोर येतो आणि मग या नाटकाचं नेपथ्य कोणी केलं, साग्रसंगीत कोण देतंय आणि पटकथा कुठं बसून लिहिल्या गेली हे समोर यायलं वेळ लागत नाही. शरद पवार यांच्या हाती सध्या राजकीय घड्याळ नसलं तरी कोणती चाबी फिरवली की घड्याळातील काटे भराभर फिरतात हे त्यांना माहिती आहे. आज सकाळीच शरद पवार यांनी ही चाबी फिरली आणि घड्याळीतील सर्वच काटे सैरभैर झाले. आजच्या राष्ट्रवादीच्या शपथविधीच्या अंकाचा पडदा जरी राष्ट्रवादीच्या नेत्यांनी उघडला असला तरी दोरी कुणाच्या हाती आहे, हे समोर आणण्यात शरद पवार हे यशस्वी झाले. थोरल्या साहेबांनी एकाच बार मध्ये टोळधाड आणि कणसावरील पक्षी आकाशात भिरकावल्याचे जोरदार चर्चा राज्याच्या राजकारणात रंगली. एकाच दगडात अनेक पक्षी गार करण्याची हतोटी थोरल्या साहेबांकडं पूर्वीच असल्याची चर्चा राजकीय चाणक्यांमध्ये रंगली आहे. शरद पवार यांनी आज सकाळी पत्रकार परिषद घेतली. माध्यमांची नस शरद पवारांनाही माहिती आहे. त्यांनी प्रश्न येताच फटकारे मारले. त्याचे परिणाम पुढील तासात राज्यात दिसले. धावपळ, गदारोळ आणि या सर्वच घडामोडींमागे कोण सूत्रधार आहे, याचे समतोल गणित शरद पवार यांनी मांडले. शरद पवार यांनी



राजकीय पटलावर संध्याकाळी घडामोडी घडल्या. पण जो संदेश दिल्या गेला. त्याचे दूरगामी परिणाम होतील हे सकाळच्या मुलाखतीने साध्य झालं शरद पवार यांनी सकाळच्या पत्रकार परिषदेत एकाच बाणात शंभर गार असा पॅटर्न राबवला. एकाच दगडात अनेक पक्षी टिपले. आज सुनेत्रा पवार या शपथ घेणार हे आपल्या गावी

पडद्याआड घडलेल्या गोष्टींची वाचत्या न करता राजकारणातील हा वेगळा टर्न लागोलाग राज्यासमोर आणला. सकाळच्या त्यांच्या मुलाखतीने अचूक टायमिंग साधलं आणि परिपाक ,परिणामासह साधला. समाजमनात थेट संदेश गेला. नसल्याचे सांगत त्यांनी खळबळ उडवली. तर या शपथविधीच्या प्रकरणात राजकीय पक्ष म्हणूनच नाही तर कुटुंब म्हणूनही आपला दुरान्वये संबंध नाही हा संदेश देण्यात पवार यशस्वी ठरले. सुनील तटकरे, प्रफुल्ल पटेल यांचं नाव घेतं त्यांनी पडद्यामागील सूत्रधाराचं नाव बाहेर आणलं नाही. पण वर्षावरील बैठकीनं लोकांचा अंदाज पक्का झाला. तर इतक्या घाईत शपथविधी का घेण्यात येत आहे यावर भाष्य न करता हा मुद्दा मात्र त्यांनी समोर आणला. त्यावरून दिवसभरात चर्चांना पेव फुटले. तर राष्ट्रवादीच्या विलीनिकरणातही आपण सहभागी नव्हतो असे त्यांनी रेखाटले. दोन्ही बाजूच्या राष्ट्रवादीचे नेते सकारात्मक होते. त्यांच्या सुसंवाद तयार झाला होता. अजित पवार हे विलीनिकरणासाठी आग्रही होते. जयंत पाटील यांच्यासोबत दादांची बैठक झाली. 12 फेब्रुवारी रोजी दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याची घोषणा होणार होती हा गौप्यस्फोट पवारांनी केला. तर त्याचवेळी सध्याचे राष्ट्रवादीतील नेते नेमकं त्याच्या उलट वागत असल्याचा मोठा संदेश यातून द्यायला ते विसरले नाहीत. तर सर्वात महत्त्वाचं म्हणजे भाजप हे सर्व घडवून आणत आहे का? यावर कुठलंही भाष्य न करता वा त्याविषयी एक चकार शब्द ही न बोलता तशा चर्चा मात्र आपोआप घडल्या. शरद पवार यांनी या सर्वांमधून मोठा संदेश दिला आहे. तर राष्ट्रवादीच्या एकत्रिकरणाबाबत आता खंड पडल्याचे सांगत त्यांनी थेट संदेश दिला आहे..

## दादांनी झारीतले शुक्राचार्य ओळखले होते, वहिनी सावध असा... त्या पोस्टने वेधले सर्वांचं लक्ष

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे संपूर्ण राज्यावर शोककळा पसरली आहे. अशातच आता सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली आहे. त्यानंतर आता शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आहे. यात त्यांनी अजित पवार यांच्यासोबतच्या काही आठवणी सांगितल्या आहेत. तसेच सुनेत्रा पवार यांना सावध राहण्याचा इशारा दिला आहे. सुषमा अंधारे यांनी नेमकं काय म्हटलं ते सविस्तर जाणून घेऊयात. आपण खूप कमी वेळा भेटलोय. पण जेव्हा कधी भेटलोय अगदी मनापासून. दादांची आणि माझी असंख्य वेळा भेट झाली पण मी दादांसोबत एकदाही आवर्जून फोटो काढला नाही. चांगल्या लोकांसोबत आपण फोटो काढायला हवेत ते आपण का काढत नाहीत याबद्दल पहिल्यांदाच पश्चाताप वाटतोय.

28 तारखेला दादांच्या बाबत जे काही झालं ते अकल्पित होतं. शत्रूवरही अशी वाईट वेळ येऊ नये ती आपल्यावर येऊन ठेपली. अहिल्यादेवी होळकर वैद्यकीय महाविद्यालयाच्या अतिदक्षता विभागातल्या एका खाटेवर दादांचे निष्प्राण कलेवर निपचित पडले होते. पार्थ दादा ( आता तोच आमच्यासाठी दादा) प्रत्येकाला आत न येण्याची विनवणी करत होते मात्र गर्दीला आवर घालणं अशक्य होतं.

मी फार घायकुतीला येऊन पार्थ दादाला विनंती केली. आणि ते मला दादा आहेत त्या खाटेपर्यंत घेऊन गेले. आत तुम्ही उभ्या होतात. शांत.. सुन्न... बधिर... त्यानंतर बाजूच्याच खोलीत उदयनराजे, जयंत पाटील, प्रफुल पटेल या सगळ्यांच्या समवेत बसलेले पवार साहेब दिसले. मी वाकून नमस्कार केला. बाहेर पडले आणि पुन्हा आपण बसलेल्या बाजूच्या खोलीत येऊन थांबले. तब्बल अडीच तास त्या खोलीत तुम्हाला प्रत्येक माणूस येऊन भेटत होता. विठ्ठल मणियार काका, उदयनराजे, असंख्य आमदार, दादांचे स्वीय सहाय्यक ढिकले, दादांचे अंगरक्षक... सगळ्यात शेवटी माजी पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला अन त्यानंतर राज्याचे मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री... कुणाशीच भेटताना तुमच्या चेहऱ्यावरचे भाव बदलले नाहीत. तुम्ही तितक्याच शांत.. स्थितप्रज्ञ बसून होतात.

तुम्हाला न्याहाळत असताना नियती इतका मोठा अन्याय कसा करू शकते असं वाटून वारंवार हुंदके दाटून येत होते. पण तुमच्यासमोर रडायचं नाही असं दटावल्यामुळे गपगुमान आवंढा गिळून होते. अन मग तुम्हीच आपुलकीच्या ओलाव्याने हाक मारली. मी जवळ जवळ झेपावले. तुमच्या मांडीवर डोकं ठेवून रडले. या दुःखातून तुम्ही कशा सावराल असा विचार करत होते... पण 29ला दादांचा अंत्यविधी होता होता दादांच्या राजकीय वारसदाराची चर्चा सुरू झाली. काय आश्चर्य आहे, दादा सारख्या अत्यंत कर्तृत्वान निर्णय क्षमता असणाऱ्या आणि प्रचंड दूरदृष्टीच्या कामाचा आवाका असणाऱ्या माणसाची उणीव कुणीही भरून काढू शकणार नाही असं म्हणणारे भलेभले मातब्बर नेते दादाची उणीव भरून काढण्यासाठी वायुवेगाने कामाला लागले...!!

## अजितदादांचा अपघात की घातपात? सरपंचाच्या व्हिडीओचा हवाला देत जयंत पाटील काय म्हणाले? खळबळ उडवणारं

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाती मृत्यूनंतर राजकारण ढवळून निघाले होते. या अजितदादा पवार यांचा राष्ट्रवादी आणि शरद पवार यांची राष्ट्रवादी एकत्र येण्याची चर्चा या आधी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकात दरम्यान सुरु झाल्या होत्या.अनेक ठिकाणी दोन्ही पक्षांनी एकत्र निवडणूका लढवल्या होत्या. मात्र, या दोन्ही पक्षांचे मिलन होण्याबद्दल शरद पवार यांच्या पक्षातील नेतेच वक्तव्य करताना दिसत होते. मात्र, काल अजितदादा यांच्या अस्थि विसर्जनानंतर लागलीच राष्ट्रवादी काँग्रेसची बैठक होऊन अजितदादांच्या पत्नी सुनेत्रा पवार या उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेण्यासाठी राजी झाल्या. त्यानंतर आज शनिवारी लोकभवनात सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. याआधी शरद पवार यांच्या पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी अजितदादांच्या अपघाताबद्दल खळबळजनक वक्तव्य केले आहे. जयंत पाटील यावेळी म्हणाले की पहाटे साडे तीन चारला निघून साडे सातला मी तिथे पोहचलो. अजितदादाही आले. अन्य आमचे नेतेही आले. पक्षाचे अध्यक्ष शशिकांत शिंदेही तिथे आले आणि अजितदादाही आले. अजितदादांनी आम्हाला सांगितले होते की बरोबर येताना मी सुनील तटकरेंना बरोबर घेऊन येतो. मात्र काही कारणांनी ते आले नाहीत असे त्यांनी त्यावेळी सांगितले. त्यानंतर तेथे सांगितले आपण लवकरात लवकर हा निर्णय घेऊ. मात्र, निवडणूक आयोगाने नगर पालिकांच्या निवडणूका जाहीर केल्या, त्या संपायच्या आधी महापालिकेच्या निवडणूका जाहीर केल्या, त्या संपायच्या आधी, जिल्हा परिषदेच्या निवडणूका जाहीर केल्या.

# दोन वेळा मुख्यमंत्रिपद मिळत होतं, साहेब नको म्हटले म्हणून अजितदादा बाजूला सरकले

## ते जगातील सर्वात आज्ञाधारक पुतण्या : सुरेश धस

बीड: भाजप आमदार सुरेश धस (Suresh Dhas) यांनी अजित पवार (Ajit Pawar) यांच्या अपघाती मृत्यूमुळं अगणित, अपरिमित शब्द कमी पडेल इतकं मोठं नुकसान झालं आहे, असं म्हटलं. एकट्या पवार घराण्याचं, पक्षाचं, पक्ष, विचारधारा आपलं चालूच राहील, परंतु, सगळ्यांना बरोबर घेऊन चालणारा, सगळ्यांची सगळ्या पद्धतीनं व्यवस्था पाहणारा एक माणूस आपल्यातून हरपला हे मान्य करावा लागेल, असं सुरेश धस यानी म्हटलं. आष्टी विधानसभा मतदारसंघाच्यावतीनं अजित पवार यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण करतो, असं सुरेश धस म्हणाले. आष्टी पंचायत समितीच्या सभागृहात सर्वपक्षीय पदाधिकारी व नागरिकांच्या वतीने अजित पवारांना आदरांजली वाहण्यासाठी सर्वपक्षीय शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी ते बोलत होते. अजित पवार यांनी समाजासाठी एवढं मोठं काम केलं, रात्रंदिवस काम केलं. अजित पवार जरी पवारसाहेबांचा पुतण्या म्हणून पुढं आले. मात्र नंतरच्या काळात स्वत: ची ताकद निर्माण करण्याचं काम अजित पवार यांनी केलंय, असं सुरेश धस यांनी म्हटलं. अजित पवार यांच्यासारखा आज्ञाधारक पुतण्या जगात दुसरा कोणी होणार नाही. तुम्हाला याचं कोडं पडेल परंतु



मला स्वत: माहिती आहे. दोन वेळा राज्याचं मुख्यमंत्रिपद भेटत असताना सुद्धा साहेब नको म्हणाले म्हणून बाजूला सरकलेला पुतण्या हा आहे हे आपल्याला नम्रपणे या ठिकाणी सांगतो, पुढे काय झालं त्याच्या बद्दल भाष्य करत नाही. जगातील सर्वात आज्ञाधारक पुतण्या असा मी त्यांचा या ठिकाणी उल्लेख करेन.

आमच्या दादांना योग्य त्या ठिकाणी ईश्वरानं जागा द्यावी एवढीच विनम्र प्रार्थना करतो. आपल्या सर्वांच्या भावना त्याच आहेत, काही जण डोळ्याच्या बाहेर अश्रू काढू शकत असतील, आपण नाही काढू शकत नाही. पंरतु मनात भावना आहे, काल तर मला देखील आवरता आलं नाही. पंरतु, तुम्हाला सांगतो अनेक लोकांनी, घरादारातल्या लहान लेकरांना वाईट वाटलं, लहान लेकरं सुद्धा त्या दिवशी रडली, असं म्हणत सुरेश धस यांनी अजित पवार यांना भावपूर्ण आदरांजली व्यक्त केली.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com